**महाराष्ट्र शासन**

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय
## (लेखा शाखा)

जिल्हा मुख्यालय पालघर, पालघर-बोईसर रोड, कोळगाव ता-पालघर
जिल्हा-पालघर पिन कोड-४०१ ४०४

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२३९१२५
Email ID: lekhacollectorpalghar@gmail.com

---

क्र.लेखा/कक्ष-२२२/टे-१/कावि-२७ /२०२६ दिनांक :-१५ /०५/२०२६

---

## इतिवृत्त

पालघर जिल्हाधिकारी कार्यालय व त्याअधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तसेच भूसंपादन व पुनर्वसन कार्यालयांमध्ये विविध प्रकल्पांच्या अनुषंगाने कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रियेव्दारे पुरवठादाराची नेमणूक करणेकामी या कार्यालयाकडून क्र. लेखा/कक्ष २२२/टे-१/कंत्राटी मनुष्यबळ /निविदा/ कावि २७२/२०२६ दि. १२/०५/२०२६ अन्वये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदा सूचनेनुसार दि. १४/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. निवासी उपजिल्हाधिकारी पालघर यांचे अध्यक्षतेखाली निविदापूर्व बैठक घेण्यात आली आहे. सदर बैठकीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी, कर्मचारी व इच्छुक निविदादार उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थिताचे नाव | पदनाम | संपर्क क्रमांक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष भागडे | निवासी उपजिल्हाधिकारी पालघर | | स्वाक्षरी/- |
| २ | श्री. रणजीत देसाई | उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) | | |
| ३ | श्री. महेश सागर | उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) | | स्वाक्षरी/- |
| ४ | श्री. तेजस चव्हाण | उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) | | स्वाक्षरी/- |
| ५ | श्री. प्रशांत भामरे | जिल्हा नियोजन अधिकारी पालघर | | स्वाक्षरी/- |
| ६ | डॉ. नरेंद्र माने | तहसीलदार (सर्वसाधारण) पालघर | | स्वाक्षरी/- |
| ७ | श्री. प्रशांत महाले | सहायक कामगार आयुक्त पालघर | | स्वाक्षरी/- |
| ८ | श्रीम. स्मिता खानोलकर | लेखाधिकारी, अंलेप २ जिल्हाधिकारी कार्याल पालघर | | स्वाक्षरी/- |
| ९ | श्री गणेश ट्रान्सपोर्ट डहाणू | मालक | ८४१०००१००१ | स्वाक्षरी/- |
| १० | श्रध्दा एन्टरप्रायजेस डहाणू | मालक | ९५०३३१४७९३ | स्वाक्षरी/- |
| ११ | साईवर्धन एन्टरप्रायजेस | प्रोप्रायटर | ९८२३४३०५३५ | स्वाक्षरी/- |
| १२ | आर. डी. कॉन्ट्रॅक्टर्स | प्रोप्रायटर | ९५९५०२९७६१ | स्वाक्षरी/- |
| १३ | श्री. महेश सावंत, नवी मुंबई | प्रोप्रायटर | ९२२२२२२००४ | स्वाक्षरी/- |
| १४ | डायस सिक्युरीटी ॲण्ड फॅसिलिटी | प्रोप्रायटर | ९३२४८५०७०७ | स्वाक्षरी/- |
| १५ | बी.एस.ए. कॉर्पोरेशन | Executive | ९००४७०२३३३ | स्वाक्षरी/- |
| १६ | मे अर्चना सर्विसेस वसई | Executive | ८३९०३०६२८८ | स्वाक्षरी/- |
| १७ | पुजा लेबर कॉन्ट्रॅक्टर | प्रतिनिधी | ९८९२७२५६२३ | स्वाक्षरी/- |
| १८ | दिनेश बी. संखे | मालक | ९७६५३५०३८१ | स्वाक्षरी/- |

सर्वप्रथम उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर विषयांकित प्रयोजनासाठी मागविण्यात आलेल्या निविदा सूचनेमधील अटी व शर्तीसंबंधात इच्छुक निविदादारांना शंका विचारण्याची संधी देण्यात आली. त्यानुसार इच्छुक निविदादारांनी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले असता सदर मुद्यांवर खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या.

| मुद्दा उपस्थित करणाऱ्या निविदादाराचा तपशील | उपस्थित केलेला मुद्याचे विवरण | उपस्थित केलेल्या मुद्याचे अनुषंगाने दिलेली सूचना |
|---|---|---|
| मे. बी. एस. ए. कॉर्पोरेशन लि. | सदर निविदेमध्ये वित्तीय दर तसेच तांत्रिक गुणांकन समान असल्यास, अशा परिस्थितीत निविदा अंतिम मंजुरीसाठी कोणती कार्यपध्दती अवलंबविण्यात येईल याबाबत कृपया स्पष्टता द्यावी. | **सदर बाब ही अपवादात्मक परिस्थितीत निर्माण होणारी आहे. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाल्यास निविदा सूचनेतील अट क्र. ६४ नुसार निविदा समितीशी चर्चा करुन नियमोचित मूल्यमापनाच्या आधारे योग्य तो निर्णय घेण्यात येईल.** |
| | बहुतांश निविदादारांचे निविदा प्रस्ताव मुख्य कार्यालयामार्फत सादर करण्यात येत असल्याने, निविदेवर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकृत प्रतिनिधीची पुढील सर्व निविदा प्रक्रियेदरम्यान प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य राहणार नाही, अशी अट सुधारित करण्यात यावी. निविदादारामार्फत प्राधिकृत पत्राव्दारे अधिकृत करण्यात आलेला इतर संबंधित प्रतिनिधी देखील निविदेसंदर्भातील बैठका, कागदपत्र पूर्तता व इतर कार्यवाहीस उपस्थित राहण्यास पात्र राहील, याबाबत कृपया आवश्यक सुधारणा/स्पष्टता प्रदान करावी. | **सदर अट अधिकृत निविदादाराच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे सदर अटीमध्ये सुधारणा करता येणार नाही.** |
| | सदर निविदेअंतर्गत अपेक्षित मनुष्यबळाची एकूण संख्या कृपया स्पष्ट करावी | **सदर निविदेमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी लागणाऱ्या कंत्राटी पदांची नावे व त्यांना अनुज्ञेय मानधनाचा तपशील विनिर्दिष्ट केला आहे. तथापि, आवश्यकतेनुसार विविध योजना व त्या त्या वेळी कार्यालयीन कामकाजाचे आवश्यकतेनुसार कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सद्यस्थितीत पदांची संख्या निश्चित नसल्यामुळे मनुष्यबळाची एकूण संख्या नमूद केलेली नाही.** |
| | अनुभव या निकषांतर्गत नमूद ५ वर्षांच्या अनुभवासाठी गुणांकन देतांना एकापेक्षा अधिक कार्यादेश/करार आदेशांचा एकत्रित विचार करण्यात येईल काय, याबाबत कृपया स्पष्टता द्यावी. | **अनुभव या निकषांतर्गत नमूद ५ वर्षांच्या अनुभवासाठी गुणांकन देतांना त्या त्या कालावधीसाठी एकापेक्षा अधिक कार्यालयात काम केल्याचा अनुभवाचा विचार करण्यात येईल.** |
| मे. साईवर्धन एन्टरप्रायजेस | निविदेत नमूद केलेल्या सेवाशुल्काच्या रकमेवरच १८% वस्तू व सेवा कर आकारता येईल असे निविदा सूचनेत नमूद केले आहे. परंतु नियमानुसार एकूण मानधन + सेवा शुल्क मिळून येणाऱ्या एकूण रकमेवर १८% GST आकारण्याबाबत अटीत बदल करणे आवश्यक असल्याचे सुचविले. | **प्रस्तुत मुद्याचे अनुषंगाने मानधनाची स्थूल रक्कम + सेवा शुल्क या रकमा मिळून येणाऱ्या एकूण रकमेवर १८% GST आकारण्यात येईल.** |

| | | |
|---|---|---|
| | इसारा रक्कम भरण्यातून बेरोजगार सहकारी संस्थांप्रमाणे इतर निविदादारांना सूट देण्यात येणार किंवा कसे? | **प्रस्तुत मुद्याचे अनुषंगाने निविदा सूचनेत नमूद केलेनुसार बेरोजगार सहकारी संस्थांसह उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र. भांखस-२०१४-प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि. ०१/१२/२०१६ अन्वये शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांना आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. वरील घटकांत न बसणाऱ्या निविदादादारांना वरीलप्रमाणे सूट अनुज्ञेय असणार नाही.** |

उर्वरीत बाबींच्या इच्छुक निविदादारांना निविदेतील अटी व शर्तीबाबत शंका, सूचना आहेत किंवा कसे, याबाबत विचारणा केली असता कोणासही शंका व सूचना नसल्याचे सांगितले.

तरी सदर इतिवृत्त www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत सूचित केले.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी पालघर यांनी घोषित केले.

(सुभाष भागडे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर**